# हेमामालिनी यांच्या ट्रस्टला पैसे परत करण्या संदर्भातील व्रुत्त दिशाभूल करणारे व विपर्यस्त

**....मंत्री एकनाथराव खडसे**

जळगाव, दि.23 एप्रिल- अभिनेत्री हेमामालिनी यांच्या ट्रस्टला प्रदान केलेल्या जमिनीबद्दल ट्रस्टने शासनाकडे कमी दरात भरलेली रक्कम त्यांना परत करण्यासंबंधी राज्य शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. अथवा आदेश निर्गमित केलेला नाही. या संबंधाने प्रसार माध्यमात प्रसिद्ध झालेल्या बातम्या निराधार, अवास्तव आणि जनतेची दिशाभूल करणाऱ्या आहेत, असा खुलासा महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी केला आहे.

खडसे यांनी स्पष्ट केले आहे कि, सदर ट्रस्ट ला पैसे परत करण्याचा कोणताही निर्णय मंत्री मंडळाने अथवा विभागीय पातळीवर घेतलेला नाही. तसेच या संदर्भात कोणतेही आदेश देखील निर्गमित केलेले नाहीत, असे खुलशात म्हटले आहे.

..........